<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2018 रोजी भरलेल्या माहे ऑक्टोबर 2018 महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 3.**<br>**दिनांक 20 ऑक्टोबर 2018.** | नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ऍम्फीबीअस बस प्रकल्प सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/05/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1589/2018. |
| **ठराव क्र. 729.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ऍम्फीबीअस बस प्रकल्प सुरु करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.महासभेमध्ये सादर केलेल्या मुळ प्रस्तावाची अंमलबजावणी करणेसाठी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट समवेत सामज्यस् करारनामा (MOU) करण्यात येत असून सदरची बाब **<u>दप्तरी दाखल</u>** करण्यात यावा." |
| **निर्णय.** | **स्थगित.** |
| **विषय क्र. 4.**<br>**दिनांक 20 ऑक्टोबर 2018.** | वाशी सेक्टर-16 भूखंड क्र.46अे येथील 30 किऑक्स बेरोजगार दिव्यांग व्यक्तीना वितरीत करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/06/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/ 1956/2018. |
| **ठराव क्र. 730.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "वाशी सेक्टर-16 भूखंड क्र.46अे येथील 30 किऑक्स बेरोजगार दिव्यांग व्यक्तीना वितरीत करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1952, दि.19/09/2017 अन्वये मंजूर धोरणाप्रमाणे उपरोक्त जागा बेरोजगार दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता वितरीत करणेस सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **नामंजूर.** |
| **विषय क्र. 8.**<br>**दिनांक 20 ऑक्टोबर 2018.** | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2013-14 या वर्षाचा स्थानिक निधी लेखापरिक्षण अहवाल व त्याबाबत विभागांकडील अनुपालन सादर करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 05/10/2018 चे पत्र क्र. न.मुं.म.पा./ले.प./लेखा-14/1642/2018. |
| **ठराव क्र. 731.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2013-14 या वर्षाचा स्थानिक निधी लेखापरिक्षण अहवाल व त्याबाबत विभागांकडील अनुपालन सादर करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियम 1930 च्या कलम-10(1) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 107-अ नुसार लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप आणि विभागाने सादर कलेले अनुपालन अहवाल **<u>दप्तरी दाखल</u>** करण्यात यावा." |
| **निर्णय.** | **स्थगित.** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**

**माहे 20 नोव्हेंबर 2018 ची सर्वसाधारण तहकुब सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** शासन निर्णय क्र. टी पी एस - 1217/अनौ.क्र.1/ प्र.क्र.102/17/नवि-12 दिनांक 31 ऑक्टोबर 2017 रोजीच्या अधिसूचने अनुसार मौजे करावे येथील शेतकऱ्यांच्या नावे असलेली भूसंपादनातुन वगळलेली जमिनीसाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (सिडको) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदरील नेमणूकीस नवी मुंबई महानगरपालिकेचा विरोध असून सदरील जमिनीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण ठेवण्यात यावे तसेच याबाबत शासनाच्या नगरविकास विभागास कळविणे. | 22<br>ऑक्टोबर | 732<br>20/11/2018 | मंजूर |
| 2. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 110, करावेमध्ये मच्छिमार लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन त्याच्यासाठी समुद्र किनारी काहीही सोयीसुविधा नाहीत. उदा. मासळी सुकविण्यासाठी शेड, जाळी विणन्यासाठी चौथरा, शौचालय, पाणीपुरवठा, रस्ता, दिवाबत्ती इत्यादी सुविधा नाहीत याबाबतीत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांच्या परवानगीने सदरील सुविधा पुरविणे. | 23<br>ऑक्टोबर | 733<br>20/11/2018 | मंजूर |
| 3. | **डॉ.श्री.जयाजी के. नाथ, यांजकडून :-** सी.बी.डी. बेलापूर येथील गौरव म्हात्रे कला केंद्राच्या समोर असलेल्या स्टेजच्या लॉनमध्ये बाजूला असलेल्या नाल्यामधून सद्यस्थितीत साप, उंदीर, घुसी, विंचु व इतर सरपटणारे प्राणी येवून लॉनमध्ये थांबतात व तिथून मंदिर व सार्वजनिक वाचनालयामध्ये अनेक वेळा घुसलेले आहे. त्यापासून कोणत्याही क्षणी जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारू शकत नाही. तरी सदरच्या ठिकाणच्या लॉन काढून त्याठिकाणी एम-30 काँक्रीटीकरण करून देण्यात यावे, तसेच त्यामध्ये मंडप उभारणीसाठी 05 मीटरच्या अंतरावर पोल गाडण्यासाठी लोखंडी पाईप गाडण्यात यावे, व त्याला फिरकीचे झाकन लावून बंद करणे. | 29<br>ऑक्टोबर | 734<br>20/11/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र.96,नेरुळ,सेक्टर-16 छत्रपती संभाजी राजे उदयानात नव्याने हिरवळ व झाडे झुडपे लावुन सुशोभिकरण करणे. | 41<br>ऑक्टोबर | 735<br>20/11/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरूळ, सेक्टर 16सी ब्रीज टॉवर मागील सर्व्हिस रोडला एल.ई.डी. फिटींग बसविणे. | 42<br>ऑक्टोबर | 736<br>20/11/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरूळ, सेक्टर 16ए, न.मुं.म.पा. शाळा क्रमांक 9 येथे डीजीटल वर्गखोली उभारणे. | 43<br>ऑक्टोबर | 737<br>20/11/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>घणसोली विभागांतील घणसोली गावचे देवस्थान "गवळीदेव घणसोली" पर्यटन स्थळ हे नवी मुंबईतील पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहे. या ठिकाणी नवी मुंबई ते मुंबई व आजूबाजूचे पर्यटक निसर्गप्रेमी या गवळीदेव घणसोली या पर्यटन स्थळाला नियमित भेट देत असतात व पावसाळ्यात याठिकाणी मोठ्या प्रमाणात येवून निसर्गाच्या सानिध्यात आपला वेळ घालवित असतात. निसर्गनिर्मित या ठिकाणी पावसाळ्यात धबधबा निर्माण होत असतो. या ठिकाणी बंधारे बांधले तर नियमित पाणी या ठिकाणी राहू शकते. पदपथाची व्यवस्था या ठिकाणी केली तर येणाऱ्या पर्यटकांना त्याचा उपयोग होईल. येथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सन 2018-2019 च्या अंदाजपत्रकांत नवी मुंबईतील टेकड्यावरील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी तरतूद केली आहे. तरी गवळीदेव घणसोली या पर्यटन स्थळाचा विकास करणे. | 44<br>ऑक्टोबर | 738<br>20/11/2018 | मंजूर |
| 8. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील से. 3, 6, 7 मधील सर्व रस्त्यांची दुर्दशा झाल्याने प्रभागातील सर्व रस्ते डांबरीकरण करणे. | 49<br>ऑक्टोंबर | 739<br>20/11/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील चिकणेश्वर उद्यान से.03 मधील पदपथाचे स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. | 50<br>ऑक्टोंबर | 740<br>20/11/2018 | मंजूर |
| 10. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील से. 6, येथील साईकृपा ओनर्स असोशिएशन तसेच गणराज ओनर्स असो.च्या मधील पदपथ दुरूस्त करणे. | 51<br>ऑक्टोंबर | 741<br>20/11/2018 | मंजूर |
| 11. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर अंतर्गत होत असलेल्या अस्वच्छतेबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक कचरा जमा होणाऱ्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संवेदनशिल असलेल्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. | 52<br>ऑक्टोबर | 742<br>20/11/2018 | मंजूर |
| 12. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर येथे नेहमीच ठिकठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या तुंबण्याचे प्रसंग होत असतात व घाणपाणी बाहेर येऊन दुर्गंधी पसरल्याने नागरिक तक्रारी करत असतात. तेव्हा व ठेकेदार तेवढ्यापुरती कारवाई करत असतो. पण अशा ठिकाणी पाण्यातील कॅमेरा असलेल्या रॉडचा वापर करून नेमके कारण शोधता येइल अशा तंत्रज्ञानाचा वापर करून सदर मलनि:स्सारण वाहिन्या दोषमुक्त करणे. | 53<br>ऑक्टोबर | 743<br>20/11/2018 | मंजूर |
| 13 | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई पालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या प्रत्येक रहिवाशी ईमारतीला जरी ती अनधिकृत असली तरी महावितरण कंपनीच्या भुमिके प्रमाणे शपथपत्र घेऊन मालमत्ताकर लागु करावा व मागेल त्या ईमारतीला पाण्याचे कनेक्शन देऊन पाण्याचा होत असलेला अपव्यय थांबवुन त्यासाठी पाणी पुरवठ्या बाबत असलेल्या प्रचलित नियमांत सुधारणा करून पालिकेचे उत्पन्न वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात करणे. | 54<br>ऑक्टोबर | 744<br>20/11/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **14.** | **श्रीम. मंदाकिनी रमाकांत म्हात्रे, यांजकडून :-**<br>"भारतीय राज्य घटनेच्या 73 व 74 व्या घटनादुरुस्ती व त्याव्दारे भारत सरकारने नगरपालिका, नगरपरिषदा तसेच महानगरपालिका व ग्रामपंचायती यांना बहाल केलेले घटनादत्त अधिकार व कर्तेव्य प्रदान करण्या उदेश सादर करीत आहे.<br>भारताला स्वातंत्र्य मिळून 50 वर्ष झाल्यानंतर राज्यघटनेमध्ये बदल करणे करीता लोकसभेमध्ये सादर केलेल्या बीलावर झालेल्या चर्चेनुसार त्रिस्तरीय शासन पध्दती स्थापन करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला होता. परंतु राज्य सुचीमधील entry पान क्र.95 नुसार स्थानिक स्वराज्य संस्था हया राज्य शासनाच्या अखात्यारीत विषय असल्यामुळे,उक्त घटनादुरुस्ती अन्वये फक्त 74 व्या घटना दुरुस्ती नुसार महानगरपालिका, नगरपालिका यांना स्वायत्त संस्था म्हणून खालील नमुद केल्याप्रमाणे घटनादत्त अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.<br>► Article 243 Q - नुसार प्रत्येक राज्याने त्यांच्या अधिकार क्षेत्रातील नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिकेची स्थापना त्या,त्या शहराची लोकसंख्या व इतर बाबी विचारात घेवून स्थानीक स्वराज्य संस्था स्थापन केल्या पाहिजे.<br>**उक्त घटनादुरुस्तीतील Article 243 (ब) नगरपालिकांच्या शास्ती, प्राधिकार व जबाबदाऱ्या**<br>(क) नगरपालिकांना स्वराज्य संस्था म्हणून कामे पार पाडणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधिकर देवू शकेल. आणि (एक) आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यासाठी योजना तयार करणे (दोन) अनुसूची बारा मध्ये सुचीबध्द केलेल्या बाबी संबंधातील पाल्यासह त्यांच्यावर सोपविण्यात आलेली कामे पार पाडेल व योजनांची अंमलबजावणी करणे.<br>► या संबंधात कायदयामध्ये निविर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीचा अधिनतेने, या नगरपालिकांना शक्ती व जबाबदाऱ्या प्रदान करण्याबाबतच्या उपबंधाचा अशा कायदयामध्ये अंतर्भाव करता येईल.<br>► (ख) अनुसुची बारा मध्ये सुचीबध्द केलेल्या बाबीं संबंधातील जबाबदाऱ्यासह त्यांना प्रदान करण्यात आलेल्या जबाबदाऱ्यास पुर्ण करणे शक्य व्हावे यासाठीच आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधीकार समितीस देवू शकेल.<br>► 243 (म) वित्त आयोग<br>► (1) अनुच्छेद 243 (झ) खाली गठीत झालेल्या वित्त आयोग नगरपालिकांना आर्थिक स्थितीचे पुर्नविलोकन करील आणि पुढील बाबींच्या संबंधात राज्यपालांकडे शिफारशी करेल.<br>अशा प्रकारे 74 व्या घटना दुरुस्ती नुसार अनुसुची 12 मधील कर्तेव्य पार पाडणे करीता महानगरपालिकांना आवश्यक असणारे सर्व ते अधिकार प्रदान करण्याचे घटनात्मक दायीत्व राज्य शासनावर आहेत. | 66<br>ऑक्टोबर | 745<br>20/11/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (2) महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011 मधील कलम 45 मधील तरतुदीच्या आधीन राहून महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक, नगरपालिका सचिव, नगरपालिका उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त इत्यादी संविधानिक पदावर महापालिका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे अधिकार मा.महासभेस निहीत करण्यात आले आहे तर कलम 51 अन्वये असंविधानिक पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार हे महापालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेस आहेत.<br>अशा प्रकारे कलम 45 अन्वये संविधानीक पदावर कलम 51 अन्वये असंविधानीक पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकांना असतांना सुध्दा महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमात दुरुस्ती अंती कलम 45 (ब) नुसार सहाय्यक आयुक्त व सहाय्यक आयुक्त पदाच्या समकक्ष असणाऱ्या व त्यापेक्षा वरिष्ठ असणाऱ्या सर्व पदावर राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी प्रतिनियुक्तीने, नियुक्त भरण्याचा अधिकार स्वत:कडे घेतलेला आहे. परिणामी नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवर , 02 अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा  परिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, 05 उपआयुक्त, 01 शिक्षणाधिकारी, 1 विभाग अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे.<br>वर नमुद केल्याप्रमाणे नमुंमपाच्या आस्थापनेवरील सर्व महत्वाच्या पदावर राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीवर राज्य शासनाने नियुक्ती केल्यामुळे एक अर्थाने प्रतिनियुक्ती वरील अधिकाऱ्याने नवी मुंबई महानगरपालिका ओलिस (अपहरण / जेरबंद ) ठेवलेली आहे.<br>**कलम 45 (ब) मधील तरतुदी संक्षिप्तरित्या खालीलप्रमाणे सादर करीत आहे.**<br>"(1) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर<br>कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भु असले तरी, राज्य शासनाने या प्रयोजनार्थ निविर्दिष्ट केलेल्या राज्य शासनाच्या संवर्गातुन, एखादया योग्य अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करुन भरण्यासाठी कोणत्याही महानगरपालिकेतील कोणतेही पद किंवा कोणत्याही पदांचा वर्ग **राजपत्रात** अधिसुचित करणे राज्य शासनासाठी विधीसंमत असेल :<br>परंतु, अशी प्रत्येक अधिसुचना निर्गमित केल्यानंतर ती राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहाकडे मांडण्यात येईल.<br>(2) पोट-कलम (1) अन्वये पद किंवा पदाचा वर्ग विनिर्दिष्ट करण्याकरीता काढलेल्या प्रत्येक अधिसुचनेमध्ये राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या ज्या संवर्गातुन पोट - कलम (1) अन्वये अधिसुचित केलेली पदे भरण्यात येतील त्या अधिकाऱ्यांच्या संवर्गाचे (यात यापुढे ज्याचा निर्देश "पुरक संवर्ग" असा केला आहे) वर्णन अंतर्भुत असेल.<br>(3) पोट-कलम (1) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर त्यानुसार अधिसूचित करण्यात आलेल्या पदांच्या संख्येइतकी पदे पूरक संवर्गात निर्माण करून पूरक संवर्गातील पदाच्या संख्याबळात वाढ करण्यात येईल | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (4) पोट-कलम (1) अन्वये पुरक संवर्गात निर्माण केलेली वाढीव पदे, शक्यतोवर, संबंधित महापालिकेच्या एका किंवा अनेक योग्य अधिकाऱ्यांची राज्यशासन, नियमाद्वारे विहित करील अशा रितीने निवड करून, भरण्यात येतील.<br>परंतु या कलमातील कोणत्याही गोष्टीचा पोटकलम (1) अन्वये ज्या दिनांकास अधिसूचना काढण्यात येईल त्या दिनांकास, महानगरपालिकेतील ते अधिसूचित पद धारण करण्याऱ्या पदधारकाच्या नियुक्तीवर आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्तींवर परिणाम होणार नाही.<br>कलम-45(ब) मधील पोटकलम-(2),(1),(3) पोटकलम (1) च्या (3) इत्यादिचा काळजीपूर्वक विचार केल्यास असे स्पष्ट दिसून येते की, कलम 45 (ब) मधील तरतुदीस अधिन राहून राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यातील विविध महापालिकेच्या आस्थापनेवर करणेकरीता, सर्वप्रथम राज्य शासनाने **पुरक संवर्ग** तयार करणे आवश्यक आहे अशा तयार करण्यात आलेल्या पूरक संवर्गात महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणकोणत्या पदांचा अंतर्भाव करण्यात आला त्याबाबत राज्य शासनाच्या राजपत्रात माहिती प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.<br>अशाप्रकारे प्रसिद्ध केलेल्या पुरक संवर्गातील ज्या पदावर महाराष्ट्र शासनच्या सेवेतील ज्या, ज्या अधिकाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाने करणेकरीता, प्रतिनियुक्तीने नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यांचे नाव, राज्य शासनाच्या सेवेतील त्यांचे पद ज्या कोणत्या महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्या पदावर अशा राज्यशासनाच्या सेवतील अधिकाऱ्यांचे प्रतिनियुक्तीने नियुक्ती करायची आहे अशा बाबींचा इंतभूत तपशील, राज्य शासनाने अधिसूचना जारी करून राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.<br>आणि वर नमूद केल्याप्रमाणे पुरक संवर्गामध्ये अंतर्भूत केलेली पदनामे व त्या महापालिकेच्या पदावर नियुक्त केलेल्या राज्यशासनाच्या सेवेतील अधिकारी इत्यादी द्यावयाची माहिती राज्यशासनाने अधिसूचना जारी केल्यापासून पुढील 06 महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या विधानसभेच्या विषय पत्रिकेत समाविष्ट करून, विधानसभेची मंजूरी घेणे अनिवार्य आहे.<br>वरील बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाने नमुंमपाच्या आस्थापनेवरील कोणत्या मंजूर पदनामाचा अंतर्भाव **पूरक संवर्गात** केलेला आहे. पुरक संवर्गातील पदावर ज्या 02 अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी , 05 उपआयुक्त, 01 शिक्षणाधिकारी, विभाग अधिकारी यांची नियुक्ती केल्यासंबधी राज्य शासनाची अधिसूचना व अशा अधिसूचनेस विधानसभेने दिलेली मंजूरी अदयाप नवी मुंबई महानगरपालिकेच्या मा. आयुक्तांनी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर केलेली नाही त्यामूळे मा.आयुक्त मा.महासभेस अंधारात ठेवून महापालिकेच्या तिजोरीतून कररुपाने प्राप्त झालेल्या निधीतून ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते मा.महासभेच्या मंजुरीविना आतापर्यंत अदायगी केले आहे ती सर्व रक्कम वसूल करण्याचे निर्देश मा.महासभेने आयुक्तांस दयावेत अशी या ठरावाच्या सुचनेद्वारे मी सभागृहास विनंती करत आहे.<br>► याजबरोबर राज्य शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011" मध्ये दुरुस्ती अंती घातलेले कलम 45 (ब) हे 74 व्या घटनादुरुस्तीतील Article 243 (ब) मधील | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उपदेशास हरताळ फासणारे असुन राज्य शासन महापालिकेला 74 व्या घटनादुरुस्ती अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराची पायमल्ली करीत असल्याने कायद्यातील दुरुस्ती ही घटनाबाहय असुन अधिकारांचे "केंद्रीकरण" असल्यामुळे मा.महासभेस मी अशी विनंती करते की, "महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011" मधिल कलम 45 (ब) हे रद्द करणेकरीता मा.सभागृहाने एकमताने ठराव संमत करुन राज्य शासनास नवी मुंबई महानगरपालिकेच्या भावना कळवाव्यात ही विनंती.<br>► मी या ठरावाव्दारे मा.महापौर यांना कळकळीची विनंती करते की, उपरोक्त वरनमुद केल्याप्रमाणे कलम 45 (ब) चा सर्रास दुरुपयोग केल्यामुळे नमुंमपाच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त व सहाय्यक आयुक्तच्या समकक्ष व त्यापेक्षा वरीष्ठ पदावर नमुंमपाच्या आस्थापनेवरील प्रामाणिक अधिकाऱ्यास पदोन्नती ने नियुक्ती करण्याचे अधिकारावर मर्यादा आल्यामुळे सर्वच अधिकाऱ्यांना 50% पदोन्नती पासुन वंचित रहावे लागत आहे. परिणामी भविष्यात त्यांना नैराश्य येण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>► या शिवाय राज्य शासनाच्या सेवेतील ज्या अधिकाऱ्याची नमुंमपाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्यामुळे ते अधिकारी आम्हास, जनतेने जनप्रतिनिधी म्हणून निवडुन दिलेले असतांना सुध्दा कोणत्याही लोकप्रतिनिधीचे, पदाधिकाऱ्याचे काहीही ऐकत नाहीत, किंबहूना कायद्याने गठित केलेल्या प्रभाग समिती, विधी समिती, स्थायी समिती इत्यादी महासभेने मंजुर केलेल्या ठरावास अक्षता दाखवतात. परिणामी प्रत्येक नगरसेवकांस त्याच्या प्रभागातील जनहिताची कामे करणेकरिता प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्याचे दालनास वारंवार भेटी देवून उबंरठे झिजवावे लागते.<br>म्हणून मा.महापौर साहेबांनी या विषयाचे गार्भिय विचारात घेवून सदरचा विषय महाराष्ट्र राज्याच्या महापौर परिषदे मध्ये उपस्थित करावा व सर्व महापालिकांच्या सभागृहात याबाबत विचार विनिमय करुन अशा स्वरुपाचा ठराव समंत करुन राज्य शासनास परत पाठवावा अशी मी वैयक्तिकरित्या मागणी करीत आहे.<br>असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2011 च्या कलम 45 (ब) नुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनावर प्रतिनियुक्ती वर नियुक्त केलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.धनराज गरड, उप आयुक्त श्री.किरणराज यादव, श्री.तुषार पवार, श्री.नितीन काळे, श्री.दयानंद निमकर, श्री.संदिप संगवे यांच्या प्रतिनियुक्ती महाराष्ट्र शासनाने अद्याप विधान सभा वा विधान परिषदेमध्ये यांची प्रतिनियुक्तीस मान्यता घेतल्या संबंधी महाराष्ट्र राज्य राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द केली नाही. तसेच नमुंमपाच्या आयुक्तांनी अद्याप ही बाब नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती अथवा मा.सर्वसाधारण सभेच्या विषय पटलावर सादर केले नाही. म्हणून उपरोक्त अधिकाऱ्यांना त्वरीत त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याकरिता ही महासभा बहूमताने ठराव समंत करीत आहे. ठरावाची अंमलबजावणी होईपर्यत उपरोक्त प्रतिनियुक्ती वरील अधिकारांचे वेतन व भत्ते नवी मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीतुन देण्यात येवू नये असे महानगरपालिकेचे मत आहे | | | |

| | |
|---|---|
| **तांतडीचे का. क्र. 123. दिनांक 20 ऑक्टोबर 2018.** | नेरूळ येथील सेक्टर -14 मधील भुखंड क्र. पी-8 व पी-9 विभाग कार्यालय बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./2158/2018. |
| **ठराव क्र. 776. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | नेरूळ येथील सेक्टर -14 मधील भुखंड क्र. पी-8 व पी-9 विभाग कार्यालय बांधणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 4 कोटी, 84 लाख, 60 हजार 500 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **स्थगित.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**